# महाराष्ट्र शासन

क्र.एफएलडी-२०२२/प्र.क्र.२८०/फ-१०

E-mail: deskf10.rfd-mh@gov.in

महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १७.११.२०२२

**प्रति,**

प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, नागपूर
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर

**विषय:** वनजमीन-नागपूर
मानेगाव (रिठी), ता. रामटेक, जि. नागपूर येथील ९९.९५ हे. संरक्षित वनजमीन मँगनीज खाण व त्यानुषंगिक बाबींकरीता M/s. Shanti G.D. Ispat & Power Pvt. Ltd., Raipur यांना वळती करणेबाबत.

**संदर्भ:** अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी यांचे पत्र क्र. कक्ष-१७/ नोडल / नागपूर/आय.डी.१२८२५ (१५)/१६०१/२०२२-२३, दि.२७.०९.२०२२

मानेगाव (रिठी), ता. रामटेक, जि. नागपूर येथील ९९.९५ हे. संरक्षित वनजमीन मँगनीज खाण व त्यानुषंगिक बाबींकरीता M/s. Shanti G.D. Ispat & Power Pvt. Ltd., Raipur यांना वळती करणेबाबतचा प्रस्ताव संदर्भीय पत्रान्वये शासनास प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने खालील मुद्यांबाबत आपले अभिप्राय शासनास सादर करावेत:-

१) प्रकल्पासाठी प्रस्तावित संरक्षित वनजमीन ९९.९५ हे. आहे. तर वनेतर जमीन केवळ ५.०५ हे. आहे. वनजमिनीच्या नक्त वर्तमान मूल्याची किंमत खाजगी जमिनींच्या बाजारभावापेक्षा कमी असल्याने कंपनीने वनजमीन निवडण्याचा [illegible] प्रयत्न केला आहे किंवा कसे ?

२) सुमारे १०० हे. वनजमिनीची मागणी करण्यापूर्वी त्या जमिनीत ते खनिज आहे किंवा नाही यासाठी सर्वप्रथम Prospecting होणे गरजेचे आहे, प्रकल्प यंत्रणेने भाग-I मध्ये Prospecting करण्यात आल्याचे तर काही ठिकाणी ते करण्यात आलेले नाही असे, नमूद केले आहे. त्यामुळे संभ्रम निर्माण होतो.

a) Prospecting करण्यात आले असल्यास, त्यास वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्रीय पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालयाची मंजूरी घेतली आहे किंवा कसे?

b) असल्यास, Prospecting किती क्षेत्रावर करण्यात आले होते? त्यापैकी किती क्षेत्र वनक्षेत्र आहे?

३) प्रकल्पामध्ये ३५,७०३ वृक्षांची तोड संभवते. एखाद्या प्रकल्पासाठी एवढ्या मोठ्या प्रमाणात वृक्षतोड करणे उचित ठरेल किंवा कसे?

४) सदर प्रकल्प पेंच व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रापासून ५ कि.मी. अंतरावर तर ESZ पासून केवळ ३.५ कि.मी. अंतरावर असून वन्यजीव व व्याघ्र कॉरिडॉर (Tiger Corridor Eastern Vidarbha Landscape) मध्ये आहे. तेथे वाघासह Schedule-I मधील वन्यजीव व लोप पावत चाललेले endangered animals आढळून येतात.

a) मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नागपूर यांनी भारतीय वन्यजीव संस्थेचे मत घेण्याची आवश्यकता व्यक्त केली आहे. भारतीय वन्यजीव संस्थेचे मत घेण्यात आले आहे किंवा कसे? असल्यास, त्याची प्रत शासनास पाठवावी.

b) प्रकल्पामुळे पेंच व्याघ्र प्रकल्प, नवेगाव-नागझिरा, उमरेड क-हांडला व्याघ्र प्रकल्पातील corridor connectivity वर विपरित परिणाम होणार नाही काय?

c) व्याघ्र भ्रमणमार्गामध्ये खाणकाम (Mining) सारख्या Non- Compatible Activity करणे योग्य आहे काय?

५) सदर प्रकल्प कार्यान्वित केल्यास मोठ्या प्रमाणात वनसंपदा व वन्यजीवांना हानी पोहोचणार असल्याची शक्यता विचारात घेऊनच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) व केंद्रस्थ अधिकारी यांनी प्रस्ताव मंजूरीची शिफारस केलेली नसावी. तथापि, प्रस्ताव मंजूरीची शिफारस करावयाची नसल्यास प्रस्तावात तसे स्पष्टपणे नमूद असणे आवश्यक आहे. त्यानंतर राज्य शासन प्रकरणी गुणवत्तेनुसार यथायोग्य निर्णय घेईल. सबब, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) आणि केंद्रस्थ अधिकारी यांनी त्यांचे स्वयंस्पष्ट अभिप्राय शासनास सादर करावेत.

(गणेश जाधव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत:

उपवनसंरक्षक (प्रा.), नागपूर.